# 6 जानेवारी

## आजचा सुविचार :

ज्यावेळी देवाचा राग येईल त्यावेळी ऍक्सिडेंटल हॉस्पिटल मधून चक्कर मारून या, स्वत:ला नशीबवान समजाल !

## आजचे पंचांग :

वार – गुरुवार
दिनांक : 6 जानेवारी 2022
मास – पौष
नक्षत्र – शततारका
सुर्योदय – सकाळी 7.01 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 6. 15 वाजता

## आजचे दिनविशेष :

पत्रकार दिन
1907: मारिया मॉंटेसरी यांनी पहिली मॉंटेसरी शाळा सुरू केली. त्यांच्या शाळांमुळे पूर्व प्राथमिक शिक्षणात आमूलाग्र बदल झाला.
1929: गोरगरिब व रुग्णांची सेवा करण्यासाठी मदर तेरेसा यांचे कोलकाता येथे आगमन.
1944: दुसरे महायुद्ध – रशियन सैन्य पोलंडमध्ये शिरले.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Display – प्रदर्शन 2) Doctor - डॉक्टर 3) Domestic – घरगुती 4) Driver – वाहक / ड्रायव्हर

## आजची प्रश्नमंजुषा :

1) गायीला किती पाय असतात?

2) क्रिकेट या खेळामध्ये किती खेळाडू असतात?

3) रवंथ करणाऱ्या प्राण्यांची नावे सांगा.

4) त्रिमितीय आकृत्यांची नावे सांगा.

## बोधकथा :

### सोनेरी स्पर्श

ही गोष्ट एका लोभी श्रीमंत माणसाची आहे. एकदा वाटेत त्याला परी भेटली.परीचे केस झाडाच्या फांद्यांमध्ये अडकले होते. पैसे कमावण्याची ही नामी संधी आहे असा विचार करून, त्याने मदतीच्या बदल्यात एक वर मागितला, “तो म्हणाला मी ज्याला स्पर्श करीन त्याचे सोन्यात रुपांतर झाले पाहिजे.” त्याची ही इच्छा कृतज्ञ परीने मान्य केली. लोभी मनुष्य त्याला मिळालेल्या नवीन वराविषयी, आपल्या मुलीला व बायकोला सांगण्यासाठी घराकडे धावला. सगळा वेळ दगड, गोट्यांना स्पर्श करून सोन्यात रुपांतर करीत राहिला. तो घरी आला तेंव्हा त्याची मुलगी त्याच्याकडे धावत येवून त्याला बिलगली,. तो तिला कडेवर घेण्यासाठी खाली वाकला, मुलीला त्याचा स्पर्श होताच मुलीचे रुपांतर सोन्याच्या पुतळ्यात झाले. त्याला त्याची चूक लक्षात आली आणि नंतर तो मनुष्य, परीने दिलेला वर मागे घेण्यासाठी तिला शोधू लागला.

तात्पर्य – लोभीपणा अधोगतीला कारणीभूत ठरतो.